# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक २४.०५.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २३.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १० केसेसमध्ये १० ईसमांवर कारवाई करून २२,६४०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०१ केसमध्ये ०२ ईसमावर कारवाई करून ११,१००/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,०३७ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,४०,३५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे हुडकेश्वर:— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २४.०५.२०२६ चे ०३.१० वा. चे सुमारास, हुडकेश्वर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, हायवे रोड, हुडकेश्वर पुलाजवळील शिवांश कोल्ड्रींक सेंटर जवळून जात असता, एक इसम संशयीतरित्या दिसल्याने, त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव इरफान हमीद शेख वय २४ वर्षे रा. राऊत नगर मस्जिदजवळ, वाठोडा, नागपूर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याने घातलेल्या पॅन्टचे आत कंबरेत एक लोखंडी चाकु किंमती ५००/— रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन फिरतांना मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे सपोनि संदीप बोरकर यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे वाठोडा :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २०.०५.२०२६ चे १६.०० वा. ते दिनांक २२.०२.२०२६ चे २३.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत, प्लॉट नं. २९०, बी—विंग, योगेश्वर नगर, नागपुर येथे राहणारे फिर्यादी राकेश भावराव ठाकरे वय ४२ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन आपले पत्नीला भेटण्याकरीता सौंसर, जि. पांढुर्णा येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत

प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीतील सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने व जुनी वापरती टायटन घडयाळ असा एकुण किंमती १,८६,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे पोउपनि. कृष्णा साळुंखे ८६२५०४८८०१ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>३) पोलीस ठाणे प्रतापनगर :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २३.०५.२०२६ चे २१.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचा मुलगा नामे आदित्य रामेश्वर मेश्राम वय २१ वर्ष रा. प्लॉट क्र. १९४५, धाडीवाल ले आऊट, रिंग रोड, नागपूर हा त्याचे अॅक्टिवा मोपेड क्र. एमएच ३१ एफवाय ०४१४ ने त्याचे झेप्टोचे डिलीव्हरी कामाकरीता पोलीस ठाणे प्रतापनगर हद्दीत सावरकर नगर चौक ते प्रतापनगर चौक, रिंग रोड, ग्रॅन्ड बार अॅन्ड रेस्टारेंट समोर आला असता, त्याचे पाठीमागून येणाऱ्या अपाचे मोटार सायकल क्र. एमएच ४० डीजे १८७७ चा चालक युवराज मुकेश अलोने वय २३ वर्ष रा. बल्लारशा, जि. चंद्रपूर याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे मुलाचे मोपेडला मागुन धडक देवुन त्यास गंभीर जखमी केले तसेच स्वत: व त्याचे मागे बसलेला मित्र नामे मयुर संजय वाढई वय २२ वर्ष रा. बल्लारशा, जि. चंद्रपूर याचे जखमी होण्यास कारणीभूत झाला. जखमींना उपचाराकरीता ऑरेंज सिटी हॉस्पिटल येथे दाखल केले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी फिर्यादीचा मुलगा आदित्य यास तपासुन मृत घोषीत केले.

यापकरणी फिर्यादी रामेश्वर हरीश्चंद्र मेश्राम वय ५२ वर्षे रा. रा. प्लॉट क्र. १९४५/१४७, धाडीवाल ले आऊट, रिंग रोड, शंभरकरचे घरी किरायाने, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे प्रतापनगर येथे पोउपनि भोसले ८१०८६६८८३४ यांनी अपाचे वाहन चालक आरोपीविरूध्द कलम २८१,१०६(१),१२५(अ) भा. न्या.सं. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>१) पोलीस ठाणे अजनी</u> :—** दिनांक २१.०५.२०२६ चे १२.०७ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे अजनी हद्दीत, मेडीकल हॉस्पिटल, कॅज्युअल्टी विभागाचे बाजुला एक अनोळखी पुरूष ईसम वय अंदाजे ६० वर्षे वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळुन आले होते. त्यांना अजनी पोलीसांनी उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक २३.०५.२०२६ चे ०२.०० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकाचे वर्णन— रंग सावळा, चेहरा गोल, दाढी वाढलेली, डोक्याचे केस पांढरे, उंची ५ फुट ६ इंच, हाता पायाला खरचटल्याच्या जुन्या जखमा आहेत. नमुद वर्णनाचे मृतक इसमास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे अजनी येथे संपर्क साधावा.

यापकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरुन पोलीस ठाणे अजनी येथे सपोनि कैलास आलुरे ७५०७९६३१५३ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे मानकापूर</u> :—** दिनांक २१.०५.२०२६ चे २२.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे मानकापूर हद्दीत, मानकापूर स्टेडीयम जवळ एक अनोळखी पुरूष ईसम वय अंदाजे ६० वर्षे वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळुन आले होते. त्यांना मानकापूर पोलीसांनी उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल, वार्ड क्र. ३५ येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक २२.०५.२०२६ चे ११.३५ वा. डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरुन पोलीस ठाणे मानकापूर येथे पोउपनि रोहन पाटील यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**